# उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

## पुणे महानगरपालिका

## शहर फेरीवाला समितीचा ठराव

सभा क्रमांक :- १ दिनांक :१९/१२/२०१३

विषय क्रमांक :- १ ठराव क्रमांक :- २ खाते :- मा. महा. आयुक्त

---

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.मा/मआ/ई/१३४४, दि.१३/१२/१३ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

नो–हॉकर्स झोन म्हणून ४५ मुख्य रस्ते, १५३ चौकामध्ये सरसकट व्यवसायास प्रतिबंध न करता ज्या ठिकाणी वाहतूकीस अडथळा होणार नाही. गर्दी नसते अशा रस्ता, पदपथावर काही भागामध्ये जागा निश्चिती करुन त्या ठिकाणी फेरीवाल्यांना व्यवसायास परवानगी देणे शक्य आहे. १/३ फूटपाथपेक्षा जास्त जागेत व्यवसायास परवानगी देण्यात येणार नाही. नो–हॉकर्स रस्त्यावरील ज्या जागांमध्ये व्यवसायास परवानगी द्यावयाची आहे. अशा ठिकाणांची यादी सदस्यांनी सुचविलेले वाहतूक पोलिस शाखेकडून ना–हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे उपसूचनेसह मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

# उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

## पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :- १ दिनांक : १९/१२/२०१३

विषय क्रमांक :- ४ ठराव क्रमांक :- ३ खाते :- मा. महा. आयुक्त

---

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.मा/मआ/ई/१३४४, दि.१३/१२/१३ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

बी.एस.यु.पी. अंतर्गत बांधण्यात आलेल्या ओटा मार्केटमध्ये एकूण ११७८ गाळे (ओटे) बांधण्यात आले आहेत. या गाळ्यांमध्ये (ओट्यामध्ये) लायसन्सधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल. जे लायसन्सधारक गाळ्यांमध्ये पुनर्वसन करण्यास नकार देतील अशा लायसन्सधारकांना स्थानिक पातळीवर मे. सर्वोच्च न्यायालयाच्या १X१ मीटर पथारी व्यावसायिक ओळखपत्रामध्ये वर्ग करण्यात येतील.

वरील प्रमाणे समितीची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

**<u>उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय</u>**

## पुणे महानगरपालिका

### शहर फेरीवाला समितीचा ठराव

सभा क्रमांक :- १ दिनांक : १९/१२/२०१३

विषय क्रमांक :- ५ ठराव क्रमांक :- ४ खाते :- मा. महा. आयुक्त

---

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.मा/मआ/ई/१३४४, दि.१३/१२/१३ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

पथारी व्यवसायासाठी खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यात आले आहेत.

वर्ग अ (+) - प्रतिदिन रक्कम रु. २००/-
वर्ग अ- प्रतिदिन रक्कम रु. १००/-
वर्ग ब - प्रतिदिन रक्कम रु. ५०/-
वर्ग क - प्रतिदिन रक्कम रु. २५/-

गटई वर्गासाठी प्रतिदिन रक्कम रु. ५/-

वरील प्रमाणे समितीची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

<u>उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय</u>

पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :- २ दिनांक - ६/२/२०१४

विषय क्रमांक :- १ ठराव क्रमांक :- ५ खाते :- मा. महा. आयुक्त

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६११, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

पुणे शहरातील फेरीवाल्यांचे बायोमॅट्रिक नोंदणी करणेकामी शुल्क आकारणेकामी सर्व्हेक्षण फॉर्म फी, नोंदणी फी व ओळखपत्र फी खालीलप्रमाणे आकरण्यात येईल.

१) सर्व्हेक्षण फॉर्म फी रक्कम रु. १००/- प्रति अर्ज
२) नोंदणी फी रक्कम रु. २००/- प्रति फेरीवाला
३) ओळखपत्र रक्कम रु. २००/- प्रति फेरीवाला

तरी, वरील दरांना समितीची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :- २

दिनांक – ६/२/२०१४

विषय क्रमांक :- २ व ३ ठराव क्रमांक :- ६ खाते :- मा. महा. आयुक्त

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१२, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

शहरातील ज्या व्यवसायिकांचे राष्ट्रीय फेरीवाला धोरण–२००९ चे पुणे महानगरपालिका स्तरावर अंमलबजावणी करणेकामी शहर फेरीवाला समितीने निश्चित केलेले परवाना शुल्क हे म.न.पा. कडून करण्यात येणाऱ्या बायोमॅट्रिक सर्व्हेक्षणानुसार नोंदणी झालेल्या व्यवसायधारकास ज्या दिनांकास ओळखपत्र दिले जाईल त्या दिनांकापासून सदर व्यावसायीकास सदरचे शुल्क दैनंदिन पद्धतीने लागू होईल. अशा व्यवसायीकाने त्याच्या वर्गानुसार निश्चित केलेले शुल्क हे प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपूर्वी आगाऊ म.न.पा. कोषागारामध्ये भरणे आवश्यक राहील. तसेच ज्या यावसायीकाने परवाना शुल्क तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता थकविल्यास त्यास तीन महिन्याच्या थकबाकीपोटी अर्ध्या महिन्याच्या दैनंदिन परवाना फी दंड आकारण्यात येईल. (यापूर्वीच्या स्टॉल परवाना शुल्क दंडाचे नियमानुसार).

परंतु सध्याच्या सर्व अधिकृत परवानाधारकांना मात्र वरील मान्य केलेले शुल्क हे दि. ०१/०४/२०१४ पासूनच त्यांचे ठरविलेल्या वर्गवारीनुसार लागू होईल.

वरील धोरणास समितीची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :– २

दिनांक – ६/२/२०१४

विषय क्रमांक :– ४ | ठराव क्रमांक :– ७ | खाते :– मा. महा. आयुक्त

संदर्भ :– उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१३, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अ) पुणे शहरातील मे. महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने जी दूध केंद्रे रस्ता/पदपथावर व्यवसाय करत असतील अशा दूध केंद्राच्या स्टॉलच्या पूर्वीचे मान्य आकारमान (६×८ फूट) ऐवजी मे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार ती (२ मी. ×१ मी.) च्या आकारमानामध्ये दि. ०१/०४/२०१४ पूर्वी सुधारीत करुन दूध केंद्रांचे स्टॉल मान्य ठिकाणी ठेवणेस व त्यानुसार शासनाच्या दूध डेअरी विभागास कळविणेस.

ब) तसेच शासनाच्या दूध केंद्रांना सध्याचे परवाना शुल्क सवलती दरा ऐवजी नव्याने शहर फेरीवाला समितीने ठरविलेल्या इतर व्यवसायीकांचे १ मी. ×१ मी. जागेकरीताच्या शुल्काच्या ५०% सवलतीमधील शुल्क रु. ५०/– प्रति स्के.मी. प्रमाणे प्रती दिन (म्हणजे २ मी. ×१ मी. चे दूध केंद्र स्टॉलकरीता प्रती दिन रु. १००/– प्रमाणे) निश्चित करणे.

वरील अ व ब मधील धोरणास व मे. महाराष्ट्र शासन दूध डेअरी विभागास कळविणेस मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

# पुणे महानगरपालिका

## शहर फेरीवाला समितीचा ठराव

सभा क्रमांक :– २

दिनांक – ६/२/२०१४

विषय क्रमांक :– ५ ठराव क्रमांक :– ८ खाते :– मा. महा. आयुक्त

संदर्भ :– उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१४, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे शहरातील अतिक्रमण विभागाकडील नोंदीनुसार अंदाजे ७३५० परवानाधारक (बैठा/हातगाडी/ स्टॉल) व्यवसायिक असून त्यांची जागेवरील व्यवसायाची मोजमापे वेगवेगळी आहेत. मे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशातील निर्देशानुसार त्यामध्ये बदल करून सदर व्यवसायाची जागा (१ मी. × १ मी.) या मापात रुपांतरीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे दि. ३१/०३/२०१४ पर्यंत आकारमानात बदल करुन पथारी व्यवसायात रुपांतर करणे व व्यवसायाच्या नेमून दिलेल्या कालावधीनंतर जागेवरील साहित्य काढून घेणे व जागा मोकळी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती<br>
तथा महापालिका आयुक्त,<br>
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

पुणे महानगरपालिका

## शहर फेरीवाला समितीचा ठराव

सभा क्रमांक :- २ दिनांक - ६/२/२०१४

विषय क्रमांक :- ६ ठराव क्रमांक :- ९ खाते :- मा. महा. आयुक्त

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१५, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

राष्ट्रीय शहरी फेरीवाला धोरण २००९ व मे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशातील निर्देशानुसार अटी व शर्तींचा भंग केल्यास :-

- मान्य अटी/शर्तीनुसार व्यवसाय न करणाऱ्यास पहिल्या वेळी नोटीस देवून समज देणेस.
- नोटीस दिल्यानंतर २४ तासाच्या आत दुरुस्ती करण्यात यावी.
- अशा प्रकारे दुसऱ्यांदा अटी/शर्तींचा भंग केल्यास रक्कम रुपये १०००/- दंड आकारणे.
- तिसऱ्यांदा अटी/शर्तींचा भंग केल्यास रक्कम रुपये ५०००/- दंड आकारणे.
- पहिल्या तिन्ही वेळेस केलेल्या कारवाई नंतरही पुढील वेळेस मार्गदर्शक तत्वातील तरतूदींचा भंग केलेला आढळून आल्यास त्यांचा परवाना कायमस्वरुपी रद्द करणे.
- नोंदणी न केलेला व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यास रक्कम रुपये ५०००/- दंड आकारणे.
- ना. फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत फेरीवाल्यास प्रथम रक्कम रुपये ५०००/- दंड करणेस दुसऱ्या वेळी अशा प्रकारे आढळल्यास त्याची नोंदणी रद्द करणेस.

वरील मुद्यांस समितीची मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :- २ दिनांक - ६/२/२०१४

विषय क्रमांक :- ७ ठराव क्रमांक :- १० खाते :- मा. महा. आयुक्त

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१६, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

पुणे शहरातील फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणेबाबत घोषित केलेल्या ४५ रस्ते नो - हॉकर्स रस्त्यावरील मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन अनुज्ञेय व्यवसायाकरीता जागा निश्चित करणेसाठी यादी फेरीवाला संघटना व तज्ञ समिती यांचे मार्फत प्रस्ताव घेणेस व सदर प्रस्ताव प्रभाग फेरीवाला समितीमार्फत सादर करुन त्यास शहर फेरीवाला समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय

पुणे महानगरपालिका

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक :- २

विषय क्रमांक :- ८ | ठराव क्रमांक :- ११ | दिनांक - ६/२/२०१४ | खाते :- मा. महा. आयुक्त

संदर्भ :- उप आयुक्त अतिक्रमण यांचे जा.क्र.ई/१६१७, दि. ६/०२/२०१४ चे पत्र.

---

उप आयुक्त अतिक्रमण यांनी शिफारस केल्याप्रमाणे ङ्घ

अध्यक्ष पथारी व्यवसायिक पंचायत, पुणे जिल्हा यांचे विनंती अर्जानुसार डॉ. बाबा आढाव यांची नियुक्ती रद्द करून त्यांचे ऐवजी श्री. बाळासाहेब मोरे यांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती
तथा महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका